माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय

१३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
website : sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२२-२२०४९९८४ फॅक्स क्र.०२२-२२०४९३९०.

क्र. मुमाआ-२०२३/प्र.क्र. ७०/०२ दिनांक : १ डिसेंबर, २०२३

## कार्यालयीन आदेश

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १५ (४) अन्वये, राज्य माहिती आयोगाच्या कामकाजाचे सर्वसाधारण अधीक्षण, संचालन व व्यवस्थापन हे राज्य मुख्य माहिती आयोगाकडे निहित असेल व त्याला राज्य माहिती आयुक्त सहाय्य करतील आणि राज्य माहिती आयोगाला, या अधिनियमाखाली कोणत्याही इतर प्राधिकरणाच्या निदेशांना अधीन न राहता, स्वायत्तपणे वापरता येत असतील असे सर्व अधिकार वापरता येतील आणि करता येत असतील अशा सर्व कृती व गोष्टी करता येतील.

राज्य माहिती आयोगामध्ये पूर्वी पासून कारागृह बंदी यांच्यासाठी Video Conference पध्दतीने सुनावणी घेण्यात येत होती. तसेच कोविड कालावधीमध्ये राज्य माहिती आयोगांमधील सर्व सुनावण्या Video Conference द्वारे घेण्यात येत होत्या. तथापि, राज्य माहिती आयोगाच्या दिनांक ०६/१०/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सर्व खंडपीठांमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी राज्य माहिती आयोगातील सुनावणी अपिलार्थीच्या मागणीनुसार V. C. द्वारे / संमिश्र (Hybrid) पद्धतीने घेण्यास खालील अटी व शर्तीसह मान्यता देण्यात आलेली आहे. तद्नुषंगाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १५ (४) नुसार संमिश्र पद्धतीने (Hybrid Hearing) सुनावणी घेण्यासंदर्भात खालील अटी व शर्तीसह आदेश पारित करण्यात येत आहेत.:-

१) ज्यावेळी द्वितीय अपील सुनावणी एका माहिती आयोगामध्ये असेल आणि त्याव्यतिरिक्त इतर खंडपीठाच्या अधिनस्त क्षेत्रामध्ये (मुंबई, बृहन्मुंबई, पुणे, कोंकण, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, नागपूर) वास्तव्य करणाऱ्या अपीलकर्त्यांनी किंवा जन माहिती अधिकारी यांनी Video Conference ची मागणी केल्यास त्यांना त्यांच्या क्षेत्रातील माहिती आयोग खंडपीठाच्या कार्यालयामध्ये जाऊन Video Conference सुविधा उपलब्ध करुन घेता येईल. माहिती आयोग खंडपीठामध्ये Video Conference ची सुविधा उपलब्ध नसल्यास अपीलार्थी यांना संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी कार्यालयातून V.C. ची सुविधा उपलब्ध करुन घेता येईल.

२) माहिती आयोगाच्या वरील खंडपीठांच्या शहर / जिल्ह्या व्यतिरिक्त इतर शहर / जिल्हयातील (उदा. सातारा, सिंधुदूर्ग, गोंदिया इ.) अपीलार्थीनी किंवा जन माहिती अधिकारी यांनी Video Conference ची मागणी केल्यास संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी कार्यालयातून ही सूविधा उपलब्ध करुन घ्यावी. संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील कार्यरत अधिकृत NIC CENTRE वर उपस्थित राहून तेथील Technical Person च्या मदतीने सुनावणी प्रक्रियेत सहभाग घेता येईल.

३) उपरोक्त अनु. १ व २ येथे नमूद दोन्ही ठिकाणी Video Conference सुविधा उपलब्ध करुन घेणे शक्य न झाल्यास अपिलार्थीस संबंधित द्वितीय अपील प्रकरणांतील प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयातून Video Conference द्वारे सुनावणी प्रक्रियेत सहभाग घेता येईल.

४) अपीलार्थी हे ज्यावेळी द्वितीय अपील सादर करतील त्यावेळी त्यांनी Hybrid Hearing साठी इच्छूक असल्याबाबत कळविणे आवश्यक आहे. तद्नंतर ही अपीलार्थींना Hybrid Hearing साठी इच्छूकता कळविता येईल. मात्र सुनावणीपूर्वी किमान ४ दिवस आधी त्यांनी विशिष्ट कारण नमूद करुन त्यासंदर्भात कळविणे आवश्यक आहे. तसेच सुनावणीसंदर्भातील सर्व कागदपत्रे किमान ४ दिवस आधी आयोगास सादर करणे आवश्यक आहे. Video Conferencing दरम्यान कोणतीही नवीन कागदपत्रे सादर करता येणार नाहीत.

५) Hybrid Hearing साठी अपीलार्थी Online Video Conference द्वारे व जन माहिती अधिकारी Physical (प्रत्यक्ष) किंवा अपीलार्थी प्रत्यक्ष व जन माहिती अधिकारी Online Video Conference किंवा दोघांनी Online Video Conference अशा पध्दतीने परवानगी देता येईल.

६) जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे Online Video Conference द्वारे सुनावणीसाठी इच्छुक असल्यास त्यांनी सुनावणीपुर्वी किमान ४ दिवस आधी विशिष्ट कारण नमूद करुन त्यासंदर्भात माहिती आयोगास कळविणे आवश्यक आहे. तसेच सुनावणीसंदर्भातील सर्व कागदपत्रे किमान ४ दिवस आधी आयोगास सादर करणे आवश्यक आहे. Video Conferencing दरम्यान कोणतीही नवीन कागदपत्रे सादर करता येणार नाहीत.

७) Hybrid पध्दतीने सुनावणीदरम्यान योग्य वर्तणूक / संभाषण इत्यादी शिष्टाचाराचे पालन करण्याची जबाबदारी वादी व प्रतिवादी यांची असेल.

८) सुनावणीदरम्यान कोणालाही Video Recording करता येणार नाही. सुनावणीदरम्यान Video Recording करत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर योग्य ती प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच सुनावणीचे Video Recording करुन त्याचा Social Media किंवा इतर Social Platform वर दुरुपयोग करण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२. सदर कार्यालयीन आदेश मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(सविता जावळे)
सचिव,
राज्य मुख्य माहिती आयोग, मुंबई

प्रत: १) उप सचिव, राज्य माहिती आयोग बृहन्मुंबई, कोकण, पुणे, नाशिक,औरंगाबाद, अमरावती व नागपूर खंडपीठ.
२) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या-६), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
—यांनी सदर आदेश सर्व जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणावा.
३) उप सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
—यांनी सदर आदेश त्यांच्या अधिपत्याखालील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांच्या निदर्शनास आणावा.
~~४) संग्रहार्थ.~~